औषध शास्त्रा, औषध विज्ञान व विषशास्त्रा  विभाग

नागपूर पशुवैद्यक महाविद्यालय, नागपूर

प्रश्नावली

**प्रश्न.क्र1** सुबाभुळ हे शेंगवर्गीय झाड वैरण म्हणुन वाढविल्या जाते. प्रामुख्याने त्यामध्ये कोणत्या प्रकारची लक्षणे व विषबाधा आढळुन येते ?

**उत्तर** :– लक्षणे : या झाडामध्ये मायमोसिन नावाचे विषज तत्व ह्यात निहीत असते आणि या वैरणाचे गाभण गाईवर प्रायोगिक खाद्य प्रयोग केल्यास त्यांना कमी वजनाची वासरे / जन्मजात मृत वासरे जन्माला आढळुन येतात. आणि त्यांना गलगंड नावाचा रोग होण्याची संभावना असते. मेंढयांत नवजात गलगंड आणि लोकर गळणे ही प्रमुख लक्षणे आढळुन येतात.

**प्रश्न क्र 2.** जनावरांनी अती जास्त प्रमाणात मीठ खाल्यास कोणत्या प्रकाराची लक्षणे आढळुन येतात.

**उत्तर** :– पचनसंस्थेला दाह निर्माण होऊन जठर आंत्राशोथ व हगवण, पोटात दुखणे , शेणात श्लेष्मा , भुक कमी होणे, अंधत्व , नाकातून विसर्ग वाहणे आणि वारंवार लघवी इत्यादी लक्षणे आढळुन येतात.

**प्रश्न क्र3** वनस्पतीत निहीत असणारे ऑक्झलेट हे पालाश मिठाच्या स्वरुपात असते. या मिठाचे उच्च पातळी चाकवत, घोळ, चुकंदर, तणस हे झाडे पर्णीय अवस्थेत असतात त्यांचे अतिजास्त अंतर्ग्रहण केल्यास कोणती विषबाधा आढळून येते .?

**उत्तर :–** प्रामुख्याने यात रक्तातील कॅलशियमचे प्रमाण कमी होणे, स्नायुमध्ये अशक्तपणा येवून पक्षाघात होणे, मुत्रपिंडास हानी पोहचणे, जनावरांमध्ये विशेषतः बकऱ्या मेंढयांमध्ये स्थायु पक्षाघात,स्नायुकंप, लटपटणारी चाल अर्धशयनाची स्थितीत जनावरांच्या समुर्च्छा अवस्थेत मृत्यु ही होते. हृदय स्पंदन जलद, थोडी पोटफुगी सारखी उठबस करते. रक्तक्षय दिसुन येतो. अशाप्रकारची लक्षण आढळुन आल्यास लवकरात लवकर पशुवैद्यकाचा सल्ला घेणे आवश्यक असते.

**प्रश्न क्र4** ज्वारी फळणी केल्यानंतर विशेषतः संकरित वाण जनावरांनी खाल्यानंतर कोणत्या प्रकाराची लक्षणे विषबाधा आढळून येते .?

**उत्तरः–** विषबाधा ही तीव्र स्वरुपाची असते. आणि आजारी जनावरे 1–2 तासांमध्ये दगावतात. आत तीव्र स्वरुपातील विषबाधेत विषज पदार्थाचे अंतग्रहण झाल्यावर 10–15 मिनीटात जनावरे पीडीत होऊन 2–3 मिनीटाच्या आत दगावतात. यामध्ये आढळुन येणारी लक्षणे म्हणजे कष्टश्वसन, अस्वस्थत, अंगविक्षेप , त्वचा गडद लाल रंगाची दिसते. लटपटणे, स्नायुची थरथर जनावर अस्वस्थ होत जाते. आणि तब्येत खालावत जाते. नाडीचे ठोके मंद असुन जलद राहतात.अर्धशयानस्थिती ग्रहण केंल्याने निर्माण होणाऱ्या पोटफुगीने ओकारी होत असते.अशावेळी तातडीने पशुवैद्यकाच्या सल्याने रोगनिदान करुन उपचार घेणे आवश्यक असते.

**प्रश्न क्र5** कन्हेर हे शोभादायक झुडुपे अतिशय विषारी असतात. जनावरांना खाऊ घातल्याने किंवा खाल्यामुळे गायी बैलांमध्ये कशाप्रकारची लक्षणे आढळुन येतात.

**उत्तर :–** लाळ वाहणे, उलटया थरकाप, अस्वस्थता, मुत्रास्त्राव, पचनसंस्थेत दाह, जलदता प्रकंप वारंवार शेण पडणे , औषधोपचाराचा सल्ला पशुवैद्यकाच्या सहयाने घेणे आवश्यक असते.

**प्रश्न क्र.6** धान्यपिकांचे सेवन केल्यानंतर जनावरांमध्ये कोणत्या प्रकारची विषबाधा लक्षणे आढळुन येतात ?

**उत्तर :–**जनावरांमध्ये प्रामुख्याने खालील प्रकारच्या विषबाधा आढळुन येतात.राय धान्य भरपुर असणाऱ्या कुरणभुमीवर जनावरांची चराई केल्यास दोन स्पष्ट लक्षणसमुह अढळुन येतात. एका प्रकारात यकृतात इजा प्रकाशोतेजन व असंबद्ध चाल स्पष्टः दिसते. हया लक्षणास राय धान्यावर उगवणाऱ्या, वाढणाऱ्या बुरशी कारणीभुत असतात.

गव्हामध्ये नायट्रेट प्रमाण खतामुळे येत असतात. परिपक्व गव्हाचे पीक खाल्याने आंत्राशोथ कष्टश्वसन , लाळ वाहणे, हगवण, जोराजोरात श्वासोच्छवास, स्नायुकंप अशक्तपणा लजटपटणारी चाल, नाडीचे ठोके मंद व शारीरीक तापमानसाधारण व असाधारण इत्यादी लक्षणे आढळतात तीव्र स्वरुपातील विषबाधेत रक्त गडद लाल अथवा करडया रंगाचे असते. बाधेच्या निश्चित निदानासाठी पशुवैद्यक सल्याने वैरणाची विश्लेषण परीक्षा करुन औषोधोपचार करणे आवश्यक असते.

**प्रश्न क्र 7** एरंड ह्या वनस्पतीच्या शेंगाचा व ढेपेचे सेवन केल्यास जनावरांमध्ये कोणत्या प्रकारची विषबाधा लक्षणे आढळुन येतात?

**उत्तर :** सर्व जातीची जनावरे विषबाधेस बळी पडतात. यामध्ये घोड्याची रोगप्रवणता सर्वात जास्त राहते. गाय, बैल, मेंढ्या आणि डुकरे सौम्य स्वरुपात पिढित होतात.चालीत असंबद्धता , खुप घाम सुटणे स्नायुंचे कंपन , स्पंदन जोरात चालु असल्यामुळे जनावरांचे संपूर्ण शरीरच हालतांना दिसते. पीडीत जनावरास मळमळ असुन हगवण असते. रक्तमिश्रीत शेण पडते, औषोधोपचार पशुवैद्यकच्या सल्याने लवकरात लवकर करणे आवश्यक असते.

**प्रश्न क्र8.** सरकीच्या ग्रहनामुळे जनावरांमध्य विषबाधा लक्षणे आढळतात? त्यासाठी कोणती काळजी घ्यावी लागते?

**उत्तर :–** पऱ्हयाटी सरकीच्या बियात किंवा गाभात गॉसीपॉल नावाचे विषजतत्व निहीत असते आणि जनावरांना घातक असते. गॉसीपॉल असणारी सरकीची ढेप जनावरांसाठी आवश्यक असते. गाई बैलांना सरकीची ढेप 1 किलोपेक्षा जास्त घालु नये आणि 2 –3 महिने सतत दिल्यानंतर 3– 4 आठवडे बंद करणे आवश्यक असते. यात लक्षणे तर आढळुन येत नाही परंतु ज्या जनावरांमध्ये 'अ' जीवनसत्वाची कमतरता असते ती जनावरे विषबाधेस बळी पडण्यासची प्रवणता किंवा शक्यता वाढते.

**प्रश्न क्र. 9** धतुरा किंवा धोत्राा ही वनस्पती जनावरांनी सेवन केल्यास कोणत्या प्रकाराची विषबाधा लक्षणे आढळून येतात. ?

**उत्तर :–**गाई बैल मेंढ्यांच्या तुलनेत विषबाधेस लवकर बळी पडतात. 20 – 500 ग्रॅम हिरवी वनस्पती देखील जीवघेणी करु शकतात. या लक्षणात प्रमुख्याने तोंड सुजने नाडीचे स्पंदन वाढणे, जोराजोरात श्वासोच्छवास अविशिष्ट रवंथ किया, स्नायुंची थरथर , थरकाप इत्यादी लक्षणे आढळुन येतात. औषधोपचार पशुवैद्यकाच्या सल्याने घेणे आवश्यक आहे.

**प्रश्न क्र. 10.** सर्पदंशाचे किंवा विषारी सापाच्या चावल्याने जनावरांमध्ये कोणकोणती लक्षणे आढळुन येतात

**उत्तर :–** सर्पदंशाचा परिणाम सापांच्या जातीवर आणि आकारमानाशी निगडीत असतो. तसेच चावा घेतलेल्या जनावरांच्या आकारमानार विशेषतः जनावराच्या कातडीची जाडी आणि त्वचेखाली असणाऱ्या चरबीवर अवलंबुन असतात. चावल्याची खुन म्हणजे तिक्ष्ण टोकाने पाडलेल्या लहान छिद्राचे ओळ दिसते. बाहेरुन दोन मोठी छिद्र दिसतात. अविषारी सर्प जनावरांना चावे घेत असतात. परंतु त्याची खुण म्हणजे चायांच्या दोन ओळी दिसतात. भुजंग , पसग जातीच्या विषारी सापाचा चाव्यात स्थानिक सुज सपाटयाने वाढणारी असुन अतिशय दुःखकारी असते. सर्पदंश जनावरांना उत्तेजीत करण्यास पर्याप्त असतो. मस्तकाच्या भागावरील चाव्यासोबत सुज घडुन येते आणि कष्टश्वसन निर्माण करण्यास पर्याप्त असते. डोळयांची बाहुली विस्तारते, लाळस्त्रावण, अर्धशयन स्थिती आणि सर्वात शेवट हलकवा आढळुन येतो. श्वसनिरांधामुळे लहान जनावरांच्या मृत्यु हांत असतो. त्वरीत नजीकच्या पशुवैद्यकाला बोलवुन औषोधोपचार केल्यास वाचण्याची शक्यता असते.

**प्रश्न क्र 11** कांद्यांची विषबाधा जनावरांमध्ये अति जास्त प्रमाणात आणि खुप दिवसापर्यंत ग्रहण केल्यास निर्माण होते. त्याची खालीलप्रकारे लक्षणे आढळुन येतात.

**उत्तर :–** भुक अर्ध्यापेक्षा कमी होते., मंदावते, मलुलपणा, तणाव येणे तापमान (103 – 104$^{0}$सें ), हृदयाचे ठोके वाढतात, जोराजोरात श्वासोच्छवास, लटपटणारी चाल, लघवी लाल होणे.

**प्रश्न क्र. 12** पशु प्रक्षेत्रावरील गुराढोरात आणि शेळयामेंढयात खाद्य पाण्याद्धारे शिसाची विषबाधा झाल्यास आढळुन येणारी लक्षणे व शिसाचे उगमस्थान कोणती आहेत.?

**उत्तर :–**शिसा हा धातु रंग, वापरुन केलेले डबे कुंपन,पाया आणि खोल्यांच्या भिंतींना लावलेल्या रंग इत्यादी मार्गाने जनावरांच्या शरीरात शिरकाव करतो याचा मुख्य कारण म्हणजे शरीरात फास्फोरसची कमतरता लक्षणे तीव्र आणि सौम्य या दोन्ही स्वरुपात लक्षणे आढळुन येतात. पीडीत वासरे लटपटतात. आणि डोक्याच्या मानेच्या स्नायुचा कंप असतो. तोंड जोरात चावतात आणि फेस येतो. डोळयाच्या पापण्या वर चडतात. ढोके फिरणे, तीव्र स्वरुपात अंधत्व येतो जनावर खाली पडतो स्नायुकंप श्वसनाचा वेग व नाडीचे स्पंदन वाढलेले असते. वेढयापिसा भिंतीवर चढण्याचा प्रयत्न करतात. निर्जीव वस्तुवर डोके आपटतात.पीडित जनावरांच्या मृत्यु श्वसनकिया बंद पडल्याने होतो. सौम्य स्वरुपात 3–4 दिवस जिवंत राहतात. मलुलता, भुक मंदावते, अंधत्व आणि चलीत विषमता असंतुलन लटपटणे आणि गोल गोल फिरणे , स्नायुकंप, तोडातुन फेस, दात चावणे, पोटात दुखने, दुर्गधीयुक्त हगवण, रोगनिदान करायला जवळच्या पशुवैद्यक सल्याने करुन 10 – 14 दिवसांपर्यंत औशोधोपचार चालु ठेवावा.

**प्रश्न क्र. 13** सेलेनियम या क्षाराचे प्रमाण अतिजास्त असणाऱ्या भुभागात विषबाधा मुख्यत्वे करुन आढळुन येते. याची विषबाधा कशी व कोणत्याप्रकारे व लक्षणे कशाप्रकारे आढळून येतात.

**उत्तर :–**जनवरांना वैरण कमी पडल्यास किंवा उपलब्ध नसल्यास पर्जन्यवृष्टी कमी असल्यास, पावसाअभावी जमीनीच्या वरच्या थरातील निचरा होऊ न शकल्याने सेलेनियम साठुन राहतो. वैरण तुटवडा कमी पडल्यास जनावरे सेलेनिअम निहीत असलेली झाड झुडपे खाण्यास उद्योक्त होतात. पिडित जनावरे आंधळी असुन गोल गोल फिरत राहतात. आणि डोके एखाद्या कडी भागावर दाखवतात पोटात दुखने, शेवटच्या काळात लखवा आणि श्वसन किया बंद पडल्याने मृत्यु ओढावतो. दिर्घकालीन बाधित मलुलता, कृशता, कमतरता, पंगुपणा, शेपटीच्या केसांची गळण,खुरांच्या जन्मजात विहती आढळुन येतात. नजीकच्या पशुवैद्यक सल्याने मृत्रा व रक्तपरिक्षणावरुन करता येते. व रोगनिदान करुन औषोधोपचार चालु ठेवावा.

**प्रश्न क्र 14.**युरीयाच्या अतिजास्त किंवा चुकुन अनावधपणे ग्रहण केल्याने होणाऱ्या विषबाधेची लक्षणे व स्त्रोत कोणते आहेत ?

**उत्तर :–** स्त्रोत : युरिया पशुखाद्यामध्ये अतिजास्त प्रमाणात घातल्याने किंवा युरिया ऊसाचे धांडे मिश्रण व वाळलेले गवत युरियाचे मिश्रण याला गाई व बैल अतिजास्त रोगप्रवणवशील असतात. त्यातुलनेत घोडे आणि डुकरे कमी रोगप्रवणशील असतात. अनावधपणे युरिया फॉस्फेट खते खाल्यामुळे स्नायुकंप ( चेहरा आणि कानाचा कंप ), डोके विस्फारणे, ओटीपोटात दुखणक, तोडांतुन फेस गळणे, मृत्राप्रवृत्ती वाढणे शरीरातील पाणी कमी होणे, फुफुसात द्रव जमा होणे कष्टश्वसन, जोराजोरात हंबरडे फोडणे, नजीकच्या पशुवैद्यक सल्यानुसार रागनिदान करुन उपचार चालु ठेवणे आवश्यक आहे.

**प्रश्न क्र 15** पाराच्या विषबाधेने जनावरांत आढळणारी लक्षणे व त्याची कारणे.?

**उत्तरः–** पारा या धातुचा किंवा पारायुक्त पदार्थाचा उपयोग कवकनाशक व बुरशीनाशक म्हणुन केल्या जातो जर चुकुन किंवा बेसावधपणे पारा लावलेल्या धान्य कंणाचा अंतर्भाव पशुखाद्यात झाला तर विषबाधा उद्भवते. तीव्र स्वरुपात जठर आंत्राशोथ, उलटीत रक्त जाणे. काही तसातच

मृत्यु ओढावतो.सौम्य स्वरुपात पीढीत जनावरास केस गळणे, दुर्गधीयुक्त श्वास, मलुलता, अशक्तपणा, भुख मंदावते, खरुज ,खाज, मसुडे दुखणे, अतिसार चालीतील विषमता, गाय / बैल लटपटतात. नजीकच्या पशुवैद्यक सल्याने मुत्रा चाचणी करुन औषोधोपचार केल्यास जनावर वाचण्याची शक्यता असते.

**प्रश्न क्र16.** प्लुओरिनमुळे होणारी विषबाधा प्लुओरिनचे खाद्यावाटे अथवा पिण्याच्या पाण्यातून अंतग्रहन झाल्यास निर्माण होत असते. विषबाधा झाल्यावर आढळून येणारी लक्षणे ?

**उत्तर :–** प्लुओरियनचे सामान्यतः प्रमाण 1 पी. पी .एम असते परंतु ते 15–20 पी.पी एम पलीकडे गेल्यावर लक्षणे दिसायली लागतात. स्फुरदयुक्त चूनखडीचे कुरणभुमीवरील वरखत हे प्लुओरिसचे सर्वसामान्य कारण होय. तीव्र स्वरूपातील विषबाधा जठर– आंत्राशोध ,भुक मंदावणे, मलाविरोध किंवा अतिसार पिडीत जनावरे कष्टश्वसन, मज्जामय, स्नायुकंप, कमतरता, डोक्याची बाहुली , विस्तारलेली असणे अर्विरत चघळण्याची किया, शक्ती कमी होऊन काही तासात दगावतो सर्वप्रथम दांतात बदल घडून येतो व रोगनिदानाचे आधारभुत लक्षण होय पशुपालकांना प्रथम पंगुपणा लक्षात येतो चालयवच्या वेळी दुखायला लागते, हाड सुजलेली असतात, हाडे सहजे अस्थिभंग अर्थात आधिन होतात,सौम्य स्वरूपात दातांना फिक्कट पिवळया ,हिरव्या करडया किंवा काळया रंगाचे पट्टे दिसतात दातांची झीज व ठिसुळता ,लवकर तुटणे व मोडणे दात दुखत असल्यामुळे जनावर चाय खाऊ शकत नाही पशुवैद्यकाच्या सल्याने जनावरांच्या खाद्याची पाल्याची आजारी जनावरांच्या रक्ताची व मुत्राची प्रयोग शाळेत चाचणी करावी रोगनिदान करून घ्यावा व पशूवैद्यकाच्या सल्याने औषधोपचार चालु करावा.

**प्रश्न क्र 17.** गाजरगवत अनावधपणे किंवा चकुन अतिजास्त प्रमाणात ग्रहण केल्यामुळे जनावरांमध्ये आढळून येणारी लक्षणे?

**उत्तर :–** लक्षणे त्वचेचे रोग होतत त्यात त्वचा खाजवने अथत्व कावीळ, प्रकाश उत्तेजन खरूज ई. लक्षणे आढळून येतात.

**प्रश्न क्र 18.** तणनाशक फावरणीचे पिक ग्रहण केल्यामुळे होणरी विषबाधा व त्यावरील घरघुती उपाय.

**उत्तर :–** तणनाशक आढळल्यास प्रथम पशुवैद्यकाच्या सल्ला घेऊन त्वरीत उपचार करावा तसेच घरघुती उपाय म्हणून जनावरांना त्वरीत चिंचेचे आंबट पाणी किंवा मीठ साखरेचे पाणी पाजणे तसेच पाणी जास्त पाजवणे व पशुवैद्यकाच्या सल्ला घेऊन योग्य उपचार व विषबाधा विरूद्धचा उपचार करावा

**प्रश्न क्र 19.** शेळया मेढयांना शीळे अन्न तसेच जास्त हिरवा पाला तसेच कडधान्य खाल्यामुळे होणाऱ्या विषबांधाची लक्षणे खालील प्रमाणे आढळतात.

**उत्तर :–** नेहमी आढळणाऱ्या लक्षणे पोट फुगणे लाळ गळणे, एकाच जागेवर बसणे, चालता न येणे किंवा गोल फिरणे, श्वाश्वास वाढणे तसेच त्रास होण इ. लक्षणे आढळून येतात.

**प्रश्न क्र 20.** प्रामुख्याने जनावरांमध्ये आढळणाऱ्या विषबाधेची कारणे

**उत्तर :–** अ) वनस्पतीजन्य विषबाधा

खालील वनस्पतीच्या अति किंवा नकळत सेवनामुळे विषबाधा होते

1. ज्वारी 2. एरंड 3. अफुचे झाड 4. घाणेरी 5. तंबाखु 6. गुंज 7. मका

ब) वृक्ष व झुडूपांची विषबाधा

1. ओक 2. कन्हेर 3. सुबाभळ 4. गाजरगवत इ.

क) तण विषबाधा

1. गोखरू 2. खुर मेथी 3. अल्फा अल्फा 4. हरळी इ.

ड) रासायनिक पदार्थाची विषबाधा

1. शिसाची बाधा 2. आर्सेनिक 3. सेलेनियम 4. पारा 5.प्लुआरिन
6. तांबे 7.मीठ 8. हायड्रोसायनिक ॲसिड 9. नायट्रेट 10. ऑक्झेलेट इ.

इ) बुरशी विषबाधा

ई) तणनाशक फवारणी विषबाधा